प्रकल्पग्रस्त कर्मचाऱ्यांना अखेर न्याय

महापालिका सेवेत कायम होण्याचा मार्ग सुकर

नवी मुंबई : महापालिकेत ठोक मानधनावर गेली अनेक वर्षे कार्यरत असणाऱ्या प्रकल्पग्रस्त कर्मचाऱ्यांना कायम आस्थापनेवर घेण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. ठाणे जिल्हाधिकाऱ्यांनी कागदपत्रे छाननी केल्यानंतर संबंधित कर्मचाऱ्यांना सेवेत रूजू करून घेण्याबाबतच्या सूचना महापालिका प्रशासनाला केल्या आहेत. याबाबत मंदा म्हात्रे यांनी मंगळवारी घेतलेल्या पत्रकार परिषदेत जाहीर केले.

नवी मुंबई महापालिकेच्या स्थापनेपासून प्रशासनात सहा महिन्यांच्या मुदतीवर ठोक मानधनावर काही कर्मचारी घेण्यात आले. हे कर्मचारी प्रशासनाच्या वेगवेगळ्या विभागात कार्यरत आहेत. महापालिकेच्या सेवेत कंत्राटी स्वरूपात काम करताना अनेक कर्मचाऱ्यांना १० ते १५ वर्षे उलटून गेली आहेत. वयोमर्यादा उलटल्याने अनेकांना सरकारी भरती प्रक्रियेत सहभागी होता येणार नाही. अशा प्रकल्पग्रस्त कर्मचाऱ्यांना प्रकल्पग्रस्त कोट्यातून महापालिकेच्या आस्थापनेवर कायमस्वरूपी करण्याची मागणी बेलापूरच्या भाजप आमदार मंदा म्हात्रे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली होती. त्याला मंजुरी मिळाल्यानंतर महापालिकेतील १६३ प्रकल्पग्रस्त कर्मचाऱ्यांचे कागदपत्र सादर करण्याचे आदेश नगररचना विभागामार्फत ठाणे जिल्हाधिकारी प्रशासनाला मिळाल्या होत्या. त्यानुसार मंगळवारी ठाणे जिल्हाधिकारी प्रशासनाने या सर्व कर्मचाऱ्यांचे कागदपत्र पडताळणी करून महापालिका प्रशासनाकडे अहवाल सादर केला आहे.

प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र सादर करण्याच्या सूचना

प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र सादर करण्याच्या सूचना कर्मचाऱ्यांना दिल्या आहेत. त्यामुळे लवकरच महापालिकेच्या १६३ प्रकल्पग्रस्त कर्मचाऱ्यांना कायम सेवेत घेतले जाणार आहेत. प्रकल्पग्रस्त कर्मचाऱ्यांसोबतच महापालिकेच्या सेवेत इतर कंत्राटी कामगारांनाही कायमस्वरूपी सेवेत घेण्यासाठी आपण मागणी करणार असल्याचे म्हात्रे यांनी स्पष्ट केले. प्रशासनाच्या आदेशानुसार, प्रकल्पग्रस्त कर्मचाऱ्यांना महापालिका, एमआयडीसी आणि सिडको प्रशासनात सामावून घेतले जाणार आहे. तसेच सर्वांनी आपले प्रकल्पग्रस्त असल्याचे प्रमाणपत्र सादर करण्याची मागणी म्हात्रे यांनी केली.

भाईंदरमध्ये श्रमजीवी संघटनेचा तहसील कार्यालयावर मोर्चा

तहसिल
चलो तहसिल
चलो तह
श्रमजीवी संघटना -महाराष्ट्र

भाईंदर : मीरा-भाईंदर शहरात पंडित भीमसेन जोशी हे रुग्णालय आहे. हे रुग्णालय खासगी संस्थेला चालवण्यास देण्याच्या विरोधात श्रमजीवी संघटनेच्या वतीने अप्पर तहसीलदार कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला.

भाईंदर पश्चिमेला असलेल्या पंडित भीमसेन जोशी रुग्णालयात अपुऱ्या सोयीसुविधा तसेच अपुरे डॉक्टर व कर्मचारी यामुळे योग्य वैद्यकीय सेवा मिळत नाहीत. हे रुग्णालय खासगी संस्थेला देण्यासाठी कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली जात नाही. तसेच कर्मचाऱ्यांना पगार वेळेवर दिला जात नाही. हे रुग्णालय ठाणे महापालिका रुग्णालयाप्रमाणेच खासगी संस्थेला चालवण्यास देण्याचा प्रस्ताव आमदार गीता जैन यांनी आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांच्याकडे दिला आहे. त्याला आरोग्य मंत्री यांनी प्राथमिक होकार सुद्धा दर्शवला.

शासकीय रुग्णालय खासगी संस्थेला चालवण्यास देण्याच्या विरोधात सोमवारी श्रमजीवी संघटनेने भाईंदर पश्चिमेच्या तहसील कार्यालयावर मोर्चा काढून अप्पर तहसीलदार नंदकिशोर देखमुख यांना निवेदन देण्यात आले.

भीक मागून गोळा झालेला पैसा कार्यालयात दिला

शहरातील गोरगरीब मजूर व गरीब आदिवासींचे मूलभूत प्रश्न प्रलंबित आहेत. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव वर्षातही पाणी, रस्ते, वीज, शौचालय, वनजमीन नावावर न होणे, घरकुल, घराखालील जागा नावे न होणे अशा अनेक समस्यांना गरीबांना तोंड द्यावे लागत आहे, असे सुलतान पटेल म्हणाले. यावेळी स्नेहा पंडित, सुलतान पटेलसह पदाधिकाऱ्यांनी भीक मागो आंदोलन करत भिकेत मिळालेली रक्कम तहसीलदार कार्यालयात शासनाला देण्यासाठी जमा केली.

निवडक

नरेंद्र कृष्णा पाटील यांचे निधन

वसई : वसई पूर्व येथील बहुजन विकास आघाडीचे एक प्रमुख नेते, तथा वसई पंचायत समितीचे माजी उपसभापती नरेंद्र कृष्णा पाटील यांचे मंगळवारी त्यांच्या वसई येथील राहत्या घरी वयाच्या ६२व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले. वसईच्या पाचुबंदर स्मशानभूमीत त्यांच्यावर रात्री ९ वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले. गेले काही महिने ते आजाराशी सामना करीत होते. उपचारादरम्यान मंगळवार, २१ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ४.३०वाजता त्यांची प्राणज्योत मालवली. आ. हितेंद्र ठाकूर, आ. क्षितिज ठाकूर, आ. राजेश पाटील, ठाणे जिल्हा सहकारी बँकेचे अध्यक्ष राजेंद्र पाटील, माजी खासदार बळीराम जाधव, ज्येष्ठ नेते बबनशेठ नाईक, माजी महापौर नारायण मानकर व प्रवीण शेट्टी आदींनी पाटील यांच्या पार्थिवाचे अंत्यदर्शन घेऊन, त्यांच्या कुटुंबीयांची सांत्वना केली. त्यांच्या पश्चात पत्नी स्मिता, दोघे विवाहित भावंडे, दोन विवाहित मुली, जावई असा मोठा परिवार आहे.

सेंच्युरी रेयॉन कंपनीच्या वतीने क्रीडा स्पर्धा

उल्हासनगर : सेंच्युरी रेयॉन कंपनीच्या वतीने आंतरविभागीय क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून, त्या स्पर्धेचे उद्घाटन कंपनीचे व्हाइस प्रेसिडंट मिलींद भंडारकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी कंपनीचे शैलेंद्र तिवारी (व्हाइस प्रेसिडंट), बी.पी.कार्वा (व्हाइस प्रेसिडंट), ए.के.सहेल, आनंद ठाकुर (जनरल मॅनेजर), राजा सेन, राजाराम राव, समीर सैनी यांच्यासह कंपनीतील इतर अधिकारी व कर्मचारी प्रामुख्याने उपस्थित होते. शहाड येथील सेंच्युरी रेयॉन कंपनीच्या वतीने रामलीला मैदानात २० फेब्रुवारी ते २६ फेब्रुवारी आंतरविभागीय क्रीडा स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. यामध्ये क्रिकेट, फुटबॉल, खो-खो, कबड्डी आदी खेळाच्या स्पर्धा होणार असल्याची माहिती सेंच्युरी रेयॉन कंपनीचे जनसंपर्क अधिकारी मेहूल लालका यांनी दिली.

३० लाखांच्या एमडीसह चौघांना एपीएमसी पोलिसांकडून अटक

नवी मुंबई : मणीपूर येथून वसई येथे अंमली पदार्थ विक्रीसाठी जाणाऱ्या चौघांना एपीएमसी पोलिसांनी सापळा लावून अटक केली आहे. अलाउद्दीन मोहम्मद फजुरुद्दीन मौलाना (२६), अब्दुल कलाम मोहम्मद अबोलोन (५१), मोहम्मद मुकिम यासीन सिद्धीकी (४०) आणि फैयाज साफिक अहमद (३०) अशी या कारवाईत अटक करण्यात आलेल्या चौघांची नावे आहेत.
पोलिसांनी या चौघांजवळ सापडलेले २५० ग्रॅम वजनाचे ३० लाख रुपये किंमतीचे मेथाक्युलॉन हे अंमली पदार्थ जप्त केले आहे. तसेच त्यांनी मेथाक्युलॉन हे अमली पदार्थ नेण्यासाठी वापरलेली कार जप्त करण्यात आल्याची माहिती परिमंडळ- १ चे पोलीस उपआयुक्त विवेक पानसरे यांनी दिली.

एपीएमसी परिसरात काही व्यक्ती मेथाक्युलॉन हे अमली पदार्थ विक्री करण्यासाठी येणार असल्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक माणिक नलावडे यांना मिळाली होती. सदर माहितीच्या आधारे सहाय्यक पोलीस निरीक्षक वासिम शेख, निलेश शेवाळे व त्यांच्या पथकाने गत १६ फेब्रुवारी रोजी रात्री एपीएमसीतील मॅफको मार्केट वारणा सर्कल येथे सापळा लावला होता. त्याठिकाणी रात्री सव्वा दहा वाजण्याच्या सुमारास अलाउद्दीन, अब्दुल कलाम, मोहम्मद मुकिम आणि फैयाज हे चौघे गोल्डन रंगाच्या होंडा सिटी कारमधून आले असता, पोलिसांनी त्यांच्यावर पाळत ठेवून त्यांना ताब्यात घेतले.

लाच म्हणून स्वीकारली दारू!

वनविभागाचे कर्मचारी लाचलुचपतच्या जाळ्यात

पालघर : १० हजारांची लाच आणि दारूच्या मागणीपैकी ७६० रुपयांची दारू स्वीकारताना लाचलुचपत विभागाने वनविभागाच्या दोन कर्मचाऱ्यांना अटक करण्यात आली. एका बांधकाम व्यावसायिकाकडे मॅनेजर म्हणून काम करत असलेल्या व्यक्तीचे एक प्रकरण वनविभाग वाडा येथे एनएकरिता ना हरकत दाखला मिळणे कमी पंचनामा करणे प्रलंबित होते. त्याला ना हरकत दाखला देण्याच्या बदल्यात लाच स्वीकारण्यात आली.

विजय लक्ष्मण धुरी आणि विष्णू पोपट सांगळे वाडा वनविभाग कार्यालयात वनपाल म्हणून कार्यरत आहेत. सदर प्रकरणात दहा हजार रुपये रोख आणि दारू अशा लाचेची मागणी केली होती. त्यापैकी दारू स्वीकारताना लाचलुचपत विभागाने या आरोपींना अटक केली आहे.

कल्याणमध्ये प्रवाशांनी गाडीतून ॲसिड फेकल्याने पादचारी जखमी

कल्याण : कल्याण पूर्वेतील सूचक नाका भागातून पायी चाललेल्या एका पादचाऱ्याच्या चेहऱ्यावर एका सफेद रंगाच्या गाडीतून प्रवाशांनी ॲसिड फेकल्याने पादचारी गंभीररीत्या भाजला आहे. ॲसिड फेकल्यानंतर कार चालक भरधाव वेगाने निघून गेला. रविवारी दुपारी ही घटना कल्याण पूर्व भागातील सूचकनाका येथे घडली.

अमली पदार्थ विक्रीस आलेले दोन आफ्रिकन नागरिक अटकेत

नवी मुंबई : खारघर सेक्टर-३५ भागात मॅथाक्युलॉन या अमली पदार्थाची विक्री करण्यासाठी आलेल्या दोघा आफ्रिकन नागरिकांना गुन्हे शाखेच्या मध्यवर्ती शाखेने रविवारी दुपारी सापळा लावून अटक केली आहे.

अॅनी चिमेजी बेन्जामिन (२५) व प्रिन्स एनडी अॅडव न्युडे (३५) अशी या आफ्रिकन नागरीकांची नावे असून, गुन्हे शाखेने त्यांच्या जवळ असलेले सुमारे ५ लाख ६५ हजार रुपये किमतीचे मॅथाक्युलॉन हे अमली पदार्थ जप्त केले आहे. या दोघांनी सदरचे अमली पदार्थ कुठून आणले ? तसेच ते कुणाला विक्री करण्यासाठी आले होते, याबाबत अधिक तपास करण्यात येत आहे.

खारघर सेक्टर- ३५ मधील तळोजा जेल रोडकडुन टाटा कॅन्सर हॉस्पिटलकडे जाणाऱ्या रोडवर दोन परदेशी नागरिक मॅथाक्युलॉन हे अंमली पदार्थ विक्री करण्यासाठी येणार असल्याची माहिती गुन्हे शाखा मध्यवर्ती कक्षाला मिळाली होती. त्यानुसार गत रविवारी पथकाने तळोजा जेल रोडकडुन टाटा कॅन्सर हॉस्पिटलकडे जाणाऱ्या रस्त्यावर सापळा लावला होता. यावेळी अॅनी चिमेजी बेन्जामिन व प्रिन्स एनडी अॅडविन न्युडे हे दोघे आफ्रिकन नागरिक त्या भागात संशयास्पदरित्या आले असता, गुन्हे शाखेच्या पथकाने दोघा आफ्रिकन नागरिकांची धरपकड केली.

सूचना

हेक्सावेअर टेक्नोलॉजीस लि.

नोंदणी. कार्यालय : १५२, मिलेनिअम बिजनेस पार्क, महापे, नवी मुंबई ४०० ७१०

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की खालील इक्विटी शेअर्स संदर्भातील शेअर प्रमाणपत्र हे हरविले आहे/ गहाळ झाले आहे आणि त्यामुळे शेअरधारकाने त्या बदल्यात डुप्लीकेट शेअर प्रमाणपत्र जारी करण्यासाठी अर्ज केला आहे.

फोलियो क्र. ०१७४९६२५, शेअरधारकाचे नाव : फारूख फीरोझ तारापोर, फीरोझ जमशेद तारापोर (मयत) आणि तनाझ फीरोझ तारापोर (मयत) प्रमाणपत्र क्र. ५८४४६, विशिष्ट क्र. २८९४६३१४० २८९४६३३१४, शेअर्सची संख्या : १७५.

कोणीही व्यक्ती ज्यांचा वरील शेअर प्रमाणपत्र संदर्भात कोणताही दावा आहे त्यांना विनंती करण्यात येत आहे की त्यांनी १५ दिवसांच्या आत कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात संपर्क साधावा अन्यथा कंपनी द्वारे डुप्लीकेट शेअर प्रमाणपत्र जारी करण्याची पुढील कार्यवाही करण्यात येईल.

ठिकाण : मुंबई
दिनांक : २३ फेब्रुवारी २०२३

अर्जदार :
फारूख फीरोझ तारापोर

सूचना

सूचना याद्वारे देण्यात येते की, आम्ही मालक, जेन फर्नांडिस उर्फ डिसील्वा यांच्या खालील लिखीत अनुसूचीमध्ये अधिक विवरणीत मालमत्तेमधील सर्व त्यांचे अविभाजीत शेअर संबंधात हक्कांची पडताळणी करत आहोत.

सर्व व्यक्तींना सदर मालमत्ता वा कोणत्याही भागामध्ये मालक यांचे अविभाजीत शेअर यांच्या संदर्भात कोणतेही दावे असल्यास वा हितसंबंध असल्यास तसेच विक्री, अभिहस्तांकन, गहाण, न्यास, धारणाधिकार, भेट, प्रभार, ताबा, वारसा, भाडेकरार, वहिवाट, देखभाल, सुविधाधिकार वा अन्य काही असल्यास त्यांनी याद्वारे सदर सूचनेच्या प्रसिद्धी तारखेपासून १४ दिवसांच्या आत अधोहस्ताक्षरितांना सदर लिखीत स्वरूपात सादर करणे आवश्यक आहे अन्यथा कोणतेही सदर दावे विचारात घेतले जाणार नाहीत.

वरील संदर्भित अनुसूची :

सर्व तो भाग व भूखंड असलेली जमिन धारक सीटीएस क्र. सी/११०८ मोजमापित ५९२.८ चौ. मीटर व सी/१११० मोजमापित ४४७ चौ. मीटर एकूण मोजमापित १०३९.८ चौरस मीटर धारक सर्व रचनांसह त्यावरील उभ्या असलेल्या शेरली राजन रोड, वांद्रे (पश्चिम), मुंबई ४०० ०५० येथील गाव वांद्रे सी तालूका अंधेरी येथील नोंदणीकरण जिल्हा मुंबई उपनगरीय.

मुंबई
दि. २२ फेब्रुवारी, २०२३

जसोन वास,
भागीदार
पी. वास व कं.
वकील व सॉलिसीटर्स,
ए-१, लिबर्टी, १ ला मजला,
प्लॉट क्र. ९८-बी, हिल रोड,
वांद्रे (प), मुंबई ४०० ०५०.
ईमेल : pvas1979@gmail.com

सूचना

मी, अमित राधास्वामी जंगम, वय सुमारे ५४ वर्षे, कै. राधास्वामी जंगम यांचा मुलगा, माझ्या कुटुंबासह पत्नी शैलजा स्वामी जंगम, मुलगा हर्षित स्वामी जंगम आणि मुलगी रित्विका स्वामी जंगम यांचेसह ६०२, शिल्पा अपार्टमेंट्स, शंकर घाणेकर मार्ग, प्रभादेवी, दादर, मुंबई ४०० ०२८ राहतो आणि याद्वारे असे जाहीर करीत आहो की मी, माझ्या कुटुंबातील सदस्यांसह संयुक्तपणे आणि वैयक्तिकपणे ६०२, शिल्पा अपार्टमेंट्स, शंकर घाणेकर मार्ग, प्रभादेवी, दादर, मुंबई ४०० ०२८ यानंतर सदर परिसर म्हणून संदर्भित, येथे ११ जुलै २०१७ पासून लॉ ऑफ ॲडवर्स पजेशन द्वारे वास्तव्य करीत आहे. आमचा ताबा हा बिलकुल अबाधित आहे आणि कै. राधास्वामी जंगम यांच्या कोणत्याही कायदेशारी वारसदाराकडून कै. राधास्वामी जंगम यांचे निधनानंतर १२ जुलै २००५ पासून सदर परिसर खाली करण्यासाठी आम्हाला कोणतीही नोटीस कधी मिळालेली नाही.

कोणीही ज्यांमध्ये कै. राधास्वामी जंगम यांचे कोणीही कायदेशीर वारसदार सामिल आहेत, जर माझ्या संमति किंवा इच्छे शिवाय सदर परिसरात प्रवेश करण्याचा आणि माझा/आमचा शांतीपूर्ण ताबा बाधित करण्याचा प्रयत्न करतील तर ते त्यांच्या स्वखर्चावर आणि जबाबदारीवर फौजदारी आणि दीवाणी कायद्यांतर्गत खटला आणि कायदेशीर कार्यवाहीस पात्र असतील.

माझे/आमच्या निर्देशांप्रमाणे खालील स्वाक्षरीदारांच्या मार्फत सदर नोटीस जारी

चरणजीत सिंग चंदरपाल ॲडव्होकेट,
सुप्रीम कोर्ट ऑफ इंडिया सीनि. स्टैण्डिंग काउंसिल भारत सरकार
पत्ता ३००/१ ए आणि २, ऋषभ अपार्टमेंट्स ऑफ एस. के बोले रोड, दादर पश्चिम, मुंबई ४०० ०२८
सेल क्र. ९८२१६४०४३७
टेली. : २४३२८९४९, २४३६६२५४
ईमेल : charanchander74@rediffmail.com

जाहिर सूचना

याद्वारे सूचना दिली जाते की, माझा अशिल विशेषत: लिहिलेल्या वेळापत्रकात (''परिसर'') वर्णन केलेल्या जागेच्या खरेदीसाठी श्रीमती वीणू जय नाथानी उर्फ नीतू घनश्याम आसवानी यांच्याशी वाटाघाटी करत आहे.

विक्री, देवाणघेवाण, गहाण, शुल्क, भेट, ट्रस्ट, वारसा, ताबा, भाडेपट्टा, धारणाधिकार, देखभाल, सुखसोयी, साधन, मृत्युपत्र, भार किंवा इतर मार्गाने जागेच्या संदर्भात कोणतेही अधिकार, हक्क, दावा किंवा स्वारस्य असलेल्या सर्व व्यक्ती तथापि, याद्वारे विनंती केली जाते की ते खाली स्वाक्षरीदारास त्यांच्या कार्यालयाच्या पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यासह या तारखेपासून १४ दिवसांत कळवावे. असे न केल्यास अशा कोणत्याही दाव्यांकडे दुर्लक्ष केले जाईल आणि ते माफ केले गेले आणि/किंवा सोडले गेले असे मानले जाईल.

अधिसूची

(१) नोंदणी जिल्हा आणि मुंबई शहर आणि मुंबई उपनगर यांच्या मर्यादेअंतर्गत राम कृष्णा नगर, ड. त. रोड, खार पश्चिम, मुंबई ४०० ०५२ येथे असलेल्या आणि वसलेल्या जमीन धारक क्रमांक ई ७७२ ए च्या भूखंडावर स्थित ''रामकृष्ण नगर सूर्यकिरण को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड'' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सोसायटीमधील बिल्डिंग क्र. १५ च्या पहिल्या मजल्यावर ३५१.९८ स्क्वेअर फूट कार्पेट क्षेत्रपळ असलेला निवासी सदनिका क्र. १७४.

(२) रामकृष्ण नगर सुर्यकिरण को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लि. २१ जानेवारी २०१७ रोजी शेअर प्रमाणपत्र क्रमांक २० अंतर्गत आयोजित विशिष्ट क्रमांक २६ ते ३० असलेले रु. ५०/-पाच (०५) शेअर्सचे.

दिनांक : २२ फेब्रुवारी २०२३.

महेश एल. मोटवानी
अधिवक्ता.

SBI State Bank of India

एसएआरबी ठाणे (११६९७) : १ला मजला, केरोम, प्लॉट क्र. ११२, सर्कल रोड क्र. २२, वागळे इंडस्ट्रियल इस्टेट, ठाणे पश्चिम ४०० ६०४, शाखेचे ईमेल आयडी : sbi.11697@sbi.co.in
दूरध्वनी क्र. (कार्यालय) : ०२२-२५८०६८६१

ताबा सूचना (स्थावर मालमत्तेकरिता) (नियम ८(१) पाहा)

ज्याअर्थी, अधोहस्ताक्षरीत स्टेट बँक ऑफ इंडिया यांच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी सिक्युरिटायझेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेट्स ॲन्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (क्र. ३/२००२) अनुसार व सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ३ सहवाचिता कलम १३ (१२) अंतर्गत प्राप्त अधिकारान्वये कर्जदार श्रीम. प्रिती जेना व श्री. सौमीत रांजण जेना यांना सूचनेत निर्देशित रक्कम **रु. ५१,३५,२२४/- (रु. एकावन्न लाख पसतीस हजार दोनशे चोवीस मात्र) दि. २४.०७.२०१८** अनुसार सदर सूचनेच्या स्विकृती तारखेपासून ६० दिवसांच्या आत करण्याचे निर्देश देणारी **मागणी सूचना दि. २४.०७.२०१८** रोजी जारी केली होती.

कर्जदार यांनी सदर रकमेचा भरणा करण्यास कसूर केली असल्याने, सदर सूचना कर्जदार व आम जनतेस देण्यात येत आहे की, अधोहस्ताक्षरितांनी सीक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम, २००२ यांच्या नियम ८ सहवाचन सदर ॲक्टच्या उप-अनुच्छेद १३(४) अंतर्गत त्यांना प्राप्त अधिकारान्वये खालील निर्देशित मालमत्तेचा कर्जदार श्रीम. प्रिती जेना यांच्या संबंधात ताबा घेतला आहे.

विशेषत: कर्जदार व आम जनतेस इशारा देण्यात येत आहे की, त्यांनी सदर मालमत्तेसंदर्भात व्यवहार करू नये व असे कोणतेही व्यवहार हे स्टेट बँक ऑफ इंडियाच्या प्रभारांतर्गत रक्कम **५१,३५,२२४/- (रु. एकावन्न लाख पसतीस हजार दोनशे चोवीस मात्र) व दि. २४.०७.२०१८** अनुसार व त्यावरील व्याज व अन्य प्रभार रक्कमेच्या अधीन असेल.

कायद्याचे अनुच्छेद १३ च्या उपअनुच्छेद (८) च्या तरतुदींअंतर्गत उपलब्ध कालावधीमध्ये प्रतिभूत मालमत्ता सोडवून घेण्यासाठी कर्जदारांचे लक्ष वेधून घेण्यात येत आहे.

स्थावर मालमत्तेचे विवरण

फ्लॅट क्र. सी-५ व डी-५ सुपर बिल्ट अप क्षेत्रफळ १७१.२० चौ. मीटर धारक घर क्र. ४१/५एफ१एफ२ व ४१/५एफ१एफ३, गाव पंचायत चिकालीम, योग्य तो अविभाजीत शेअर जमिन धारक ५ वा मजला, खुली टेरेस १५८.१८ चौ. मीटर व मधला पार्किंग स्लॉट क्र. १० येथील हाऊसिंग कॉम्प्लेक्स म्हणून ज्ञात कलर्स संबंधात प्लॉट क्र. २३, सर्व्हे क्र. ४६/१, नाक्वीलीम, दाबोलीम गाव येथील मालमत्ता.

दिनांक : २०.०२.२०२३ **प्राधिकृत अधिकारी**
ठिकाण : गोवा **स्टेट बँक ऑफ इंडिया**

ई-लिलाव विक्री सूचना-डेक्स-वीन पॉलीमर्स प्रायव्हेट लिमिटेड (परिसमापनातील)

इन्सोल्व्हेन्सी ॲण्ड बँकरप्टसी कोड, २०१६ आणि त्या अंतर्गत विनियमन अन्वये तमाम जनतेस याद्वारे सूचना देण्यात येते की खाली दिलेल्या तक्तामध्ये नमूद मिळकत आणि मत्ता वेबसाईट https://ncltautcion/auctiontiger.net मार्फत सेवा पुरवठादार **मे. ई-प्रॉक्युअरमेंट टेक्नोलॉजीज लिमिटेड** (ऑक्शन टायगर) मार्फत ई-लिलावाद्वारे विकली जाणार आहे.

लिलावाच्या तारीख आणि वेळ	१८.०३.२०२३ रोजी दु. १.०० वा. ते दु. २.०० वा.
इअरच्या अंतिम तारीख	१६.०३.२०२३, सायं. ५.०० वा.
निरीक्षण तारीख आणि वेळ	मत्ता संच ४- ०६.०३.२०२३ दु. १२.०० वा. ते सायं. ४.०० वा. दरम्यान
कॉर्पोरेट कर्जदार	डेक्स-वीन पॉलीमर्स प्रायव्हेट लिमिटेड (परिसमापनातील)
मत्ता संच	संच क्र. ४: फोरेस्ट नाका, चिकलोली एमआयडीसी, अंबरनाथ येथील वाणिज्यिक गाळा
मत्ता संच- तपशीलवार विवरण आणि चौकशी	**अटी आणि शर्तीसाठी** **संपर्क येथे: agirp06gmail.com**
लिलाव सुरुवात दिनांक आणि वेळ	शनिवार, १८ मार्च, २०२३ रोजी दु. १.०० वा.
लिलाव बंद दिनांक आणि वेळ	शनिवार, १८ मार्च, २०२३ रोजी दु. २.०० वा.
राखीव किंमत	मत्ता संच ४- रु. ६७,०३,३३१/-
परताव्या इसारा अनामत रक्कम (खंड ६ मध्ये नमूद अटी नुसार)	राखीव किंमतीचे १०% जास्त नाही
किमान बोली वाढ रक्कम	मत्ता संच ४ - १ लाख

परताव्या ईअर **डेक्स-वीन पॉलीमर्स प्रायव्हेट लिमिटेड (परिसमापनामध्ये)** च्या बँक खातेमध्ये, **खाते क्रमांक ००१७२०११०००१३१६ बँक ऑफ इंडिया, शाखा डीएन रोड- मुंबई, आयएफएससी कोड बीकेआयडी००००१७** मध्ये १६.०३.२०२३ रोजी किंवा पूर्वी एनईएफटी/आरटीजीएस/डिमांड ड्राफ्ट मार्फत इच्छुक बोलीदार प्रदान करण्यात यावा.

तपशीलवार अटी आणि शर्ती आणि स्वरास्याचे अभिव्यक्ती साठी कृपया श्री. अनिश गुप्ता (परिसमापक) **agirp06gmail.com** कार्यालय येथे : १०५, लॉटस् बिझनेस पार्क, राम बाग गल्ली, एसव्ही रोड लगत, मालाड (पश्चिम), मुंबई-४०० ०६४ येथे संपर्क साधावा.

सही/-
अनिश गुप्ता
आयबीबीआय नोंद क्र. आयबीबीआय/आयपीए-००२/ आयपी-एन००२८५/२०१७-१८/१०८४३
कार्यालय येथे: १०५, लॉटस् बिझनेस पार्क, राम बाग गल्ली, एसव्ही रोड लगत, मालाड (पश्चिम), मुंबई-४०० ०६४

शरद फायबर्स ॲंड यार्न प्रोसेसर्स लिमिटेड

१९, मजला-३ रा, ४०८, प्रभादेवी इंडस्ट्रीयल इस्टेट, वीर सावरकर मार्ग, प्रभादेवी, मुंबई-४०००२५
सीआयएन: एलआय७११०एमएच१९८७पीएलसी०४३९७० ई-मेल: cssharadfibres2922@gmail.com वेबसाईट: www.sharadfibres.co.in

३१ डिसेंब, २०२२ रोजी संपलेल्या तिमाहीसाठी अलिप्त अलेखापरीक्षित वित्तीय निष्कर्ष
भाग - II ३१ डिसेंबर, २०२२ रोजी संपलेल्या तिमाहीसाठी नफा आणि तोट्याचे विवरण
जोडपत्र I
३१ डिसेंबर, २०२२ रोजी संपलेल्या तिमाहीसाठी अलिप्त वित्तीय निष्कर्षांचे विवरण

रु. लाखात

अनु. क्र.	तपशील संपणारा कालावधी महीन्यांची संख्या नमूद करावी	अलिप्त					
		संपलेली तिमाही			संपलेले नऊ महिने		संपलेले वर्ष
		(अलेखापरीक्षित)	(अलेखापरीक्षित)	(अलेखापरीक्षित)	(अलेखापरीक्षित)	(अलेखापरीक्षित)	(लेखापरीक्षित)
		३१.१२.२०२२	३०.०९.२०२२	३१.१२.२०२१	३१.१२.२०२२	३१.१२.२०२१	३१.०३.२०२२
		३	३	३	९	९	९
१	प्रवर्तनातून एकूण उत्पन्न	-	-	-	-	-	-
२	कालावधीसाठी निव्वळ नफा/(तोटा) (कर, अपवादात्मक आणि/किंवा अनन्यसाधारण बाबींपूर्वी#)	(९५.०७१)	(१.९६९)	(१.३४०)	(१०९.१६५)	(२३.६४३)	(४०.०२२)
३	कालावधीसाठी निव्वळ नफा/(तोटा) (करपूर्व, अपवादात्मक आणि/किंवा अनन्यसाधारण बाबींनंतर#)	(९५.०७१४०)	(१.९६९)	(१.३४०)	(१०९.१६५)	(२३.६४३)	(४०.०२२)
४	कालावधीसाठी निव्वळ नफा/(तोटा) (करोत्तर, अपवादात्मक आणि/किंवा अनन्यसाधारण बाबींनंतर#)	(९५.०७१)	(१.९६९)	(१.३४०)	(१०९.१६५)	(२३.६४३)	(४०.०२२)
५	कालावधीसाठी एकूण सर्वसमावेशक उत्पन्न (कालावधीसाठी नफ/ तोटा (करोत्तर) आणि इतर सर्वसमावेशक उत्पन्न (करोत्तर धरून)	(९५.०७१४०)	(१.९६९)	(१.३४०)	(१०९.१६५)	(२३.६४३)	(४०.०२२)
६	समभाग भांडवल	४३६.६४	४३६.६४	४३६.६४	४३६.६४	४३६.६४	४३६.६४
७	मागील वर्षाच्या लेखापरीक्षण ताळेबंदात दाखवल्याप्रमाणे राखीव (पुनर्मूल्यांकित राखीव वगळून)						
८	प्रति समभाग प्राप्ती (प्रत्येक रु. १०/- चे) (अखंडीत आणि खंडित कामकाजासाठी						
	ए) मुलभूत	-२.१८	-०.०५	-०.०३	-२.५०	-०.५४	-०.९२
	बी) सौम्यिकृत	-२.१८	-०.०५	-०.०३	-२.५०	-०.५४	-०.९२

टीपा: ए. वरील माहिती म्हणजे सेबी (लिस्टींग ॲंड अदर डिस्कलोजर रिक्वायरमेंटस) रेग्युलेशन्स, २०१५ च्या रेग्युलेशन ३३ अंतर्गत स्टॉक एक्सचेंजकडे सादर केलेल्या ३१/१२/२०२२ रोजीसच्या अलिप्त तिमाही निष्कर्षांच्या तपशिलवार विवरणाचा एक उतारा आहे. तिमाही वित्तीय निष्कर्षांचे संपूर्ण विवरण स्टॉक एक्सचेंजेसच्या वेबसाइटस आणि सूचिबध्द मंडळाची वेबसाईट (www.sharadfibres.co.in) वर उपलब्ध आहे.
बी. लेखा धोरणांमधील बदलांमुळे निव्वळ नफा/तोटा, एकूण सर्वसमावेशक उत्पन्न किंवा अन्य कोणत्याही संबंधित वित्तीय बाबींवरील परिणाम एका तळटीपेच्या स्वरुपत कळवला जाईल.

शरद फायबर्स ॲंड यार्न प्रोसेसर्स लिमिटेड
सही/-
ठिकाण: मुंबई **विनोद त्रिपाठी**
दिनांक: २०/०२/२०२३ **अध्यक्ष आणि कार्यकारी संचालक**

मालमत्तेची ऑनलाईन ई-लिलाव विक्री

कोटक महिंद्रा बँक लिमिटेड
नोंदणीकृत कार्यालय :- २७ बीकेसी,सी २७,६ जी प्राभाग, वांद्रे कुर्ला कॉम्प्लेस, वांद्रे (पू.), मुंबई -४०० ०५१.
शाखा कार्यालय : ॲदमास प्लाझा, १६६/१६, सीएसटी रोड, कोलिव्हरी व्हिलेज येथे सुद्धा आहे.

लिलाव व विक्रीसाठी जाहीर सूचना

प्रतिभूती अंमलबजावणी कायदा २००२ च्या नियम ८(६) च्या तरतुदीसह वाचित प्रतिभूती आणि वित्तीय मालमत्तांची पुनर्रचना आणि प्रतिभूती कायदा २००२ अंतर्गत स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री.

कृपया सदर सूचनेला एक नवीन सूचना म्हणून समजा जी सामान्यत: लोकांना आणि विशेषतः कर्जदार/हमीनदार यांना दिली जात आहे की, खाली वर्णन केलेली स्थावर मालमत्ता प्रतिभूत धनकोकडे गहाण आहे आणि ज्याचा भौतिक ताबा कोटक महिंद्रा बँक लिमिटेडच्या (केएमबीएल) प्राधिकृत अधिकाऱ्याने घेतला आहे, **स्मॉल बिझनेस फिनक्रेडीट इंडिया प्रा.लि. (एसबीएफसी)** द्वारे त्यांच्या पक्षात ऋण अभिहस्तांकनाच्या अनुषंगाने, श्री. मोहम्मद समशुद्दीन अकबर आणि श्रीमती अलमरा एस. अकबर यांच्या कडून केएमबीएल, प्रतिभूत धनको यांना देय खाते क्र. पीआर००३९३९३२ अंतर्गत रक्कम आणि प्रभारासह संपूर्ण वसूलीपर्यंत दि. १७.०२.२०२३ पासून लागू भविष्यातील व्याजासह दि. १६.०२.२०२३ रोजी अनुसार रु. ३१,०१,९५६.५७ (एकतीस लाख एक हजार नऊशे छप्पन आणि सत्तावन्न पैसे मात्र) च्या वसूलीकरीता दि. २७.०३.२०२३ रोजी दु. १२.०० वा. ते दु.०१.०० वा. दरम्यान ५ मिनिटाच्या अमर्याद विस्तारासह मालमत्ता ''जशी आहे जी आहे'', ''जशी आहे तेथे आहे'' आणि ''जे काही आहे'' या आधारावर विक्री करण्यात येईल.

दुकान क्र. ७६ साठी राखीव किंमत असेल :- रु. ११,००,०००/- (रुपये अकरा लाख मात्र) आणि दुकान क्र. ७६ साठी **इसारा रक्कम असेल :-** रु. १,१०,०००/- (रुपये एक लाख दहा हजार फक्त), **दुकान क्र. ७७** साठी आरक्षित किंमत असेल :- रु. १८,००,०००/- (रुपये अठरा लाख फक्त) आणि **दुकान क्र. ७७ साठी इसारा रक्कम असेल :-** रु. १,८०,०००/- (एक लाख ऐंशी हजार रुपये फक्त), आणि के वासी सह इरठे सादर करण्याची शेवटची तारीख २४.०३.२०२३ संध्याकाळी ६:०० पर्यंत आहे. (भा.प्र.वे.)

मालमत्तेचे वर्णन:-पोस्टाचा पत्ता:- दुकान क्र. ७६ आणि ७७, तळमजला, वृंदावन, जा+३ सीएचएसएल, प्लॉट क्र. ५२, सेक्टर-९, नवी मुंबई-४०१२०६.

अधिक तपशिलवार वर्णन :- प्लॉट ५२, सेक्टर-९, खंडा कॉलनी, नवीन पनवेल, नवी मुंबई - ४१०२०६ येथे स्थित वृंदावन (जी+३) को.ऑप.हाऊ.सोसा. नावाच्या इमारतीतमधील तळ मजल्यावरील दुकान क्र. ७६ आणि ७७ . प्लॉट ५२ खालीलप्रमाणे सिमाबद्ध: उत्तर : ११ फूट. रुंद रस्ता, दक्षिण: भूखंड क्र. ४७ ते ५१, पूर्व: प्लॉट क्र. ४२ ते ४६, पश्चिम : २० मीटर रुंद रस्ता.

प्रतिभूत मालमत्ता सोडविण्यासाठी उपलब्ध वेळेच्या संदर्भात कायद्याच्या सेक्शन १३ च्या सब-सेक्शन (८) च्या तरतुदींकडे ऋणकोचे लक्ष वेधण्यात येत आहे.

सर्वसाधारणपणे सार्वजनिक आणि विशेषत: कर्जदार कृपया लक्षात घ्या की जर येथे नियोजित लिलाव कोणत्याही कारणास्तव अपयशी ठरला तर, प्रतिभूत धनकोने प्रतिभूत धनकोच्या विवेकबुद्धीने खासगी कराराद्वारे विक्रीच्या मार्गाने सुरक्षा हित लागू केले असेल. विक्री अंतर्गत असलेल्या मालमत्तेबाबत कोणतेही स्पष्टीकरण/आवश्यकता असल्यास, बोलीदार संपर्क करू शकतात **श्री. एग्नेल पिल्लई (+९१ ८९७६९२९६८५), श्री. पुष्कर दाणी (+९१ ८१०८३८३६१३.), श्री. गुरपाल सिंग (+९१ ८९७६८९८२१२) / श्री. राजेंद्र दहिया (+९१ ८४४८२६४५१५).**

विक्रीच्या तपशीलवार अटी व शर्तींसाठी, कृपया कोटक महिंद्रा बँक **WWW.KOTAK.COM AND /OR ON HTTPS://BANKAUCTIONS.IN/** वर संकेतस्थळ अर्थात **HTTPS://WWW.KOTAK.COM/EN/BANKAUCTIONS.HTML** मध्ये प्रदान केलेल्या या लिंकचा संदर्भ घ्या.

ठिकाण:- मुंबई दिनांक : २२/०२/२०२३ **प्राधिकृत अधिकारी, कोटक महिंद्रा बँक लि.**

पंजाब नैशनल बैंक punjab national bank

सर्कल शास्त्र केंद्र, मुंबई शहर,
१८१-ए१, १८ वा मजला, 'ई' विंग, मेकर टॉवर, कफ परेड, मुंबई ४०० ००५ दूरध्वनी:- ०२२-४१०२७३०० , ४१०२७३०५-२४, ई-मेल: cs6041@pnb.co.in

ताबा सूचना

ज्याअर्थी अधोस्वाक्षरीकर्ता पंजाब नैशनल बँकचे अधिकारी या अधिकाराने, सिक्युरिटायझेशन आणि रिकन्ट्रक्शन अँड इनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ऍक्ट, २००२ अन्वये आणि कलम १३ सहवाचता सिक्युरिटी इंटरेस्ट (अंमलबजावणी) नियम २००२ च्या नियम ३ अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून दिनांक ३० .१२ .२०२२ रोजी एक मागणी सूचना जारी करून कर्जदार/ गहाणदार/ श्रीमती रुपाली रवींद्र बापट, आणि **श्री. सुधाकर गोविंद देशपांडे, आणि श्री दीपक दिलीप सोनी यांना सूचनेमध्ये नमूद रक्कम ४७,८३,४५०.६६ /- (सत्तेचाळीस लाख त्र्याऐंशी हजार चारशे पन्नास रुपये सहासष्ट पैसे मात्र) आणि ०१.१२ .२०२२** पासून थकबाकी त्यावरील व्याज सूचना मिलाल्यापासून ६० दिवसांच्या आत भरण्यास सांगितले होते.

सदर रकमेची परतफेड करण्यात कर्जदार/ गहाणदार/ हमीदार असमर्थ ठरल्याने याद्वारे कर्जदार/ गहाणदार/ हमीदार आणि सर्वसामान्य जनतेला सूचना देण्यात येते की, अधोस्वाक्षरीकरांनी खाली वर्णन केलेल्या मिळकतीचा सांकेतिक कब्जा त्यांना कथित कायद्याच्या कलम १३(४) सहवाचता सिक्युरिटी इंटरेस्ट (अंमलबजावणी) नियम २००२ च्या नियम ८ अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून ह्या **२० फेब्रुवारी २०२३** रोजी घेतला.

तारण मत्तांच्या भरणाकरिता उपलब्ध वेळेच्या संदर्भामध्ये कायद्याच्या कलम १३ चे उप कलम ८ च्या तरतुदींकडे कर्जदाराचे लक्ष वेधून घेतले जात आहे.

विशेषतः कर्जदार /गहाणदार/ हमीदार आणि सर्वसामान्य जनतेला याद्वारे इशारा देण्यात येतो की, उक्त मिळकतिशी व्यवहार करु नये. सदर मिळकतीशी केलेला कोणताही व्यवहार हा **पंजाब नैशनल बँकेच्या रक्कम ४७,८३,४५०.६६ /- (सत्तेचाळीस लाख त्र्याऐंशी हजार चारशे पन्नास रुपये सहासष्ट पैसे मात्र मात्र)** आणि त्यावरील व्याजाच्या भाराधीन असेल.

स्थावर मालमत्तेचे वर्णन

सदनिका क्रमांक ६०२, सहावा मजला, इमारत. क्र. ११ , कृष्णा ग्रीन लँड पार्क सीएचएस लि. कासार वडवली, जीबी रोड, ठाणे पश्चिम, ठाणे ४०० ६१५.

सही/-
तारीख: २० .०२ .२०२३ **एस ए वासनिक**
ठिकाण: मुंबई **अधिकृत अधिकारी, पंजाब नॅशनल बँक**

इंडियन बैंक Indian Bank
इलाहाबाद ALLAHABAD

स्ट्रेड ॲसेट व्यवस्थापन मोठी शाखा : इंडियन बँक इमारत, तळ मजला २७, मुंबई समाचार मार्ग, फोर्ट मुंबई - ४०००२३, ई-मेल : armbumbai@Indlanbank.co.in

परिशिष्ठ- ४-ए (नियम ८(६) ची तरतूद पहा)
स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता विक्री सूचना

प्रतिभूत हित (अंमवबजावणी) अधिनियम २००२ च्या ८(६) सह वाचित प्रतिभूती आणि वित्तीय मालमत्तांची पुनर्रचना आणि प्रतिभूत हित अंमवबजावणी प्रतिभूत हित कायदा २००२ अंतर्गत स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरीता ई-लिलाव विक्री सूचना.

याद्वारे सर्वसामान्य जनता आणि विशेषत: ऋणको आणि हमीदार यांना सूचना देण्यात येते की, खाली वर्णन केलेली मालमत्ता प्रतिभूत धनकोकडे गहाण/अधिकारमध्ये आहे, इंडियन बँक, एसएएम शाखेच्या प्रतिभूत धनकोच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी जिचा प्रत्यक्ष ताबा घेतला आहे आणि इंडियन बँक, एसएएम शाखा, प्रतिभूत धनको यांना देय ०१.१०.२०२२ रोजी अनुसार करार निर्दिष्ट दराने पुढील व्याजासह रु.२२,८१,७१, ८६४.९७/- (रुपये बावीस कोटी एक्याऐंशी लाख एकाहत्तर हजार आठशे चौसष्ट आणि सत्याण्णव पैसे फक्त) (३०.०९.२०२३ रोजी अनुसार) च्या वसूलीसाठी दि.१४.०३.२०२३ रोजी मालमत्तेची ''जसे आहे जेथे आहे आधारावर'' ,''जे आहे जे काही आहे आधारावर'' विक्र करण्यात येईल.

१) मे. सी. के. पी. प्रोडक्टस लिमिटेड, २२३, २रा मजला, पवई फ्लाझा अ प्रीमायसेस सीएलएस, एएस मार्ग, हिरानंदानी गार्डन, पवई, मुंबई - ४०० ०७६. तसेच येथे : ऑफिस ९०६, ९वा मजला, जय अंतरीक्ष १३/१४, पूर्व, अंधेरी, मरोल रोड मुंबई - ४०० ०५९.
२) श्री. प्रफुल्ल सुभाषचंद्र भट, बी/२३०६, स्काय फ्लेमा, दोस्ती फ्लेमिंगो, चायना मॉल कंपाउंड, टीजे मार्ग, परळ, शिवरी, मुंबई - ४०० ०१५.
३) श्री. चांक्य अरविंद धांडा, डी-१, रुणवाल पार्क, एस टी रोड, चेंबूर, मुंबई - ४०० ०७१.
४) मे. धीरज हाऊसिंग प्रायव्हेट लि., पहिला मजला, डेलसोल बिल्डिंग, सीटीएस क्रमांक सी/५९७ आणि सी/५९८, गाव वांद्रे - सी, डी मॉन्टे पार्क रोड, वांद्रे पश्चिम, मुंबई - ४०००५०.

ई-लिलाव पद्धतीने विक्रीसाठी आणल्या जाणाऱ्या मालमत्तेचे विशिष्ट तपशील खाली दिले आहेत.

अ. क्र.	वस्तू अनुसार गहाण मालमत्तेचे वर्णन	आरक्षित रक्कम इरठे	मालमत्ता आयडी
१	गाव वांद्रे-सी, डी मोन्टे पार्क रोड, वांद्रे पश्चिम, मुंबई - ४०००५० च्या सीटीएस क्र. सी/५९७ आणि सी/५९८, संपूर्ण पहिला मजला, डेलसोल इमारत.	रु. १५००.०० लाख रु. ५० लाख	आयडीबीआय ३२७२७२२२५१५ सीकेपी

बोली वाढीव रक्कम	ई-लिलावाची तारीख आणि वेळ	मालमत्तेवरील बोजा
रु. १.०० लाख	१४.०३.२०२३ सकाळी ११:०० ते दुपारी १:०० वा.	आम्हाला माहीत नाही

ऑनलाइन बोलीमध्ये सहभागी होण्यासाठी बोलीदारांना आमच्या ई-लिलाव सेवा प्रदाता एमएसटीसी लि. च्या वेबसाइटला (www.mstcecommerce.com/auction/home/ibapi) भेट देण्याचा सल्ला दिला जातो आहे. तांत्रिक सहाय्यासाठी कृपया एमएसटीसी हेल्पडेस्क क्रमांक ०३३-२३४०००२०/२३४०००२१/२३४०००२२ आणि सेवा प्रदाता हेल्प डेस्कवर उपलब्ध असलेल्या इतर हेल्पलाइन नंबरवर कॉल करा. एमएसटीसी लि. सह नोंदणी स्थितीसाठी, कृपया ibapiop@mstcecommerce.com आणि इरठे स्थितीसाठी कृपया ibapifin@mstcecommerce.com वर संपर्क साधा.

मालमत्तेचे तपशील आणि मालमत्तेचे फोटो आणि लिलावाच्या अटी व शर्तींसाठी कृपया भेट द्या: https://ibapi.in आणि या पोर्टलशी संबंधित स्पष्टीकरणासाठी, कृपया हेल्पलाइन क्रमांक १८००१०२५०२६ आणि ०११-४११०६१३१ वर संपर्क साधा. बोलीदारांना https://ibapi.in आणि www.mstcecommerce.com या वेबसाइटवर मालमत्ता शोधताना वर नमूद केलेल्या प्रॉपर्टी आयडी क्रमांकाचा वापर करण्याचा सल्ला दिला जातो.

प्राधिकृत अधिकाऱ्याचा संपर्क क्र. :- श्रीम. कल्पना पुरोहित, मोबाईल क्र. ९८१९८०७३७१.

तारीख : २१.०२.२०२३ **सही/-**
ठिकाण : मुंबई **प्राधिकृत अधिकारी, इंडियन बँक**